सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# (महसूल विभाग)
# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव

**आकाशवाणी केंद्राजवळ ता. जि. जळगाव, पिन कोड ४२५००१**

---

**क्र. आस्थाप/मावक**/२०१६/१/९/५ **दि.** ०१/०८/२०१६.

---

**<u>जाहिरात</u>**

जिल्हा निवड समिती, जळगाव मार्फत गट-क मधील खालील नमुद पदांची सरळसेवा भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | नियुक्ती प्राधिकारी | वेतनश्रेणी | एकुण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|
| १ | लिपीक-टंकलेखक | जिल्हाधिकारी जळगाव | पी. बी.१-५२००-२०२००, ग्रेड वेतन -१९०० | ११ |
| २ | वाहनचालक | जिल्हाधिकारी जळगाव | पी. बी.१-५२००-२०२००, ग्रेड वेतन -१९०० | ०१ |
| ३ | तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) | उपविभागीय अधिकारी, १) जळगाव, २) भुसावळ, ३) अमळनेर, ४) पाचोरा, ५) फैजपूर, ६) एरंडोल आणि ७) चाळीसगाव | पी. बी.१-५२००-२०२००, ग्रेड वेतन -२४०० | ३७ |
| ४ | तलाठी (पेसा क्षेत्रातील) | उपविभागीय अधिकारी, १) फैजपूर आणि २) अमळनेर | पी. बी.१-५२००-२०२००, ग्रेड वेतन -२४०० | १३ |
| ५ | कनिष्ठ लिपीक | जिल्हा निबंधक, जळगाव (नोंदणी व मुद्रांक विभाग) | पी. बी.१-५२००-२०२००, ग्रेड वेतन-१९०० | ०४ |
| | | | **एकुण** | ६६ |

वरील पदांसाठी जिल्हा निवड समिती, जळगाव यांचे मार्फत खालील विवरणपत्रात नमुद केल्याप्रमाणे त्या-त्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडुन सदर जाहिरातीद्वारे **दि. ०४/०८/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि.२०/०८/२०१६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपावेतोच्या कालावधीत www.jalgaon.nic.in / www.jalgaon.gov.in या जिल्हाधिकारी जळगाव यांच्या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**यादवारे असेदेखील आवाहन करण्यात येते की, जाहिरात प्रसिध्दीच्या दिवसापावेतो म्हणजेच दि. ०१/०८/२०१६ रोजी, सदर जाहिरातीमध्ये नमुद पदांसाठी आवश्यक अर्हता / पात्रता धारण करीत नसलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करु नयेत. तसेच, टपालाद्वारे देखील अर्ज सादर करु नयेत. टपालाद्वारे सादर केल्या जाणाऱ्या अर्जाचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.**

- **भरावयाच्या पदांचा पदनिहाय, सामाजिक व समांतर आरक्षणाची पदे दर्शविणारा तक्ता.**

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग (सामाजीक आरक्षण) | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सैनिक | अंशकालीन उमेदवार | खेळाडू | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | |
| | | | ३०% | १५% | १०% | ०५% | ०५% | ०२% | |
| **• पदाचे नाव :- लिपीक-टंकलेखक** | | | | | | | | | |
| १ | अ.जमाती | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| २ | भ.ज.ब. | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ३ | खुला | ०९ | ०३ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०४ |
| | **एकूण** | **११** | **०३** | **०१** | **०१** | **००** | **००** | **००** | **०६** |
| **• पदाचे नाव :- वाहनचालक** | | | | | | | | | |
| १ | इ.मा.व. | **०१** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | **एकूण** | **०१** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **०१** |
| **• पदाचे नाव :- तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील)** | | | | | | | | | |
| १ | अ.जाती | **०५** | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| २ | अ.जमाती | **०५** | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| ३ | वि.जा.अ. | **०३** | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| ४ | भ.ज. ब. | **०१** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ५ | भ.ज. क. | **०२** | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ६ | इ.मा.व. | **०८** | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०४ |
| ७ | वि.मा.प्र. | **०१** | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ८ | खुला | **१२** | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०३ |
| | **एकूण** | **३७** | **१२** | **०५** | **०४** | **०१** | **०१** | **००** | **१४** |

- **तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) पदासाठी अपंग आरक्षण** :- तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) या संवर्गातील रिक्त ३७ पदांपैकी ०२ **पदे अपंगांसाठी राखीव आहेत**. सदर ०२ पदे पुढीलप्रमाणे भरण्यात येतील.

१) ०१ पद 'चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु-Locomotor Disability or Celebral Palsy" या अपंग प्रकारातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून भरण्यात येईल.

२) उर्वरित ०१ पद हे (अ)'अंधत्व किंवा क्षीणदृष्टी-Blindness or Low Vision" (ब) 'श्रवणशक्तीतील दोष-Hearing Impairment" आणि (क) 'चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु-Locomotor Disability or Celebral Palsy" या तीनही अपंग प्रकारांपैकी ज्या अपंग प्रकारातील उमेदवारास गुणवत्तेनुसार उच्चतम गुण प्राप्त होतील त्या पात्र उमेदवारामधून भरण्यात येईल.

- सदर ०२ अपंग पदांचा अनुशेष हा उक्त तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) या संवर्गातील रिक्त ३७ पदांतच समाविष्ट असुन ज्या सामाजिक प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध होईल, त्यामधुन गुणवत्तेनुसार सदर पद

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरण्यात येईल.<br>• निवडसूचीची कार्यवाही करताना जास्तीत जास्त अपंगत्व असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. | | | | | | | | | |
| • **पदाचे नाव :- तलाठी (पेसा क्षेत्रातील)** | | | | | | | | | |
| १ | अ.जमाती | १३ | ०४ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०४ |
| | **एकूण** | **१३** | **०४** | **०२** | **०१** | **०१** | **०१** | **००** | **०४** |
| • **पदाचे नाव :- कनिष्ठ लिपीक** | | | | | | | | | |
| १ | अ.जमाती | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| २ | इ.मा.व. | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| ३ | खुला | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ |
| | **एकूण** | **०४** | **०१** | **००** | **००** | **००** | **००** | **००** | **०३** |
| **कनिष्ठ लिपीक पदासाठी निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारांना नोंदणी व मुद्रांक विभागाकडील सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ जळगाव यांचे अधिपत्याखालील जिल्हयातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल.** | | | | | | | | | |

## • तलाठी (पेसा क्षेत्रातील) पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना :-

१) पेसा क्षेत्रातील तलाठी पदे म्हणजेच अनुसूचित क्षेत्रातील तलाठी पदे होय.

२) शासन अधिसूचना क्र. आरबी/टीसी/ई-१३०१३(४)/नोटिफिकेशन-१/४७४/२०१४, दि. ०९/०६/२०१४ नुसार महसूल व वन विभागाकडील अनुसूचित क्षेत्रातील तलाठी पद हे **आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरण्यात येतील.**

३) **स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार** याचा अर्थ '**जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत**' असा होय.

४) जळगाव जिल्हयातील खालील तालुक्यांसमोर दर्शविलेल्या गावांतील / पाड्यांतील **जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबा सदर अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत असेच** उमेदवार तलाठी (पेसा क्षेत्रातील) पदासाठी अर्ज करु शकतील. सदर गावांची / पाड्यांची नावे ही भारताच्या राजपत्रात दि. ०२/१२/१९८५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या आधारे नमुद करण्यात आलेली आहेत.

| **अ. क्र.** | **तालुका** | **तालुक्यातील (पेसा क्षेत्रातील) / (अनुसूचित क्षेत्रातील) गावाचे / पाड्याचे नाव** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यावल | १) मानापुरी | २) तोलाणे | ३) खालकोट | ४) इचखेडे | ५) मालोद |
| | | ६) हरिपूरा (वनगाव) | ७) वाघझिरा (वनगाव) | ८) परसाडे बु | ९) बोरखेडे खुर्द | १०) लंगडा आंबा |
| | | ११) जामन्या (वनगाव) | १२) गाड्र्या (वनगाव) | १३) उसमळी (वनगाव). | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | रावेर | १) मोहमांडली (वनगाव) | २) पिंपरकुंड (वनगाव) | ३) अंधारमळी (वनगाव) | ४) तिड्या (वनगाव) | ५) निमड्या (वनगाव) |
| | | ६) गारबर्डी (वनगाव) | ७) जानोरी | ८) चिंचाटी | ९) पाल | १०) मोरव्हाल |
| | | ११) जिनसी | १२) सहस्त्रलिंग (वनगाव) | १३) लालमाती (वनगाव) | १४) आभोडे बु | १५) लोहारे |
| | | १६) कुसुंबे बु | १७) कुसुंबे खुर्द | १८) पिंप्री | १९) मोहगन बु | २०) पाडळे बु |
| | | २१) मोहमांडली जुनी. | | | | |
| ३ | चोपडा | १) मराठा (वनगाव) | २) मोरचिडा (वनगाव) | ३) उमर्टी (वनगाव) | ४) सत्रासेन (वनगाव) | ५) कृष्णापूर (वनगाव) |
| | | ६) आंगुर्णे | ७) खाऱ्यापडाव (वनगाव) | ८) वैजापूर (राजस्व) | ९) मुळयावतार (वनगाव) | १०) वैजापूर (वनगाव) |
| | | ११) बोरअजंटी (वनगाव) | १२) मालापूर (वनगाव) | १३) बोरमळी (वनगाव) | १४) कर्जाणे (वनगाव) | १५) मेलाणे (वनगाव) |
| | | १६) विष्णापूर (वनगाव) | १७) देव्हारी (वनगाव) | १८) देवझिरी (वनगाव) | १९) कुंड्यापाणी (वनगाव) | २०) लेहपूर परगणे अडावद |
| | | २१) बढवाणी | २२) बढई | २३) कंडाणे (खंडणे) | २४) मोहरद | २५) असलवाडी (वनगाव) |

५) तलाठी (पेसा क्षेत्रातील) या पदासाठी निवड करण्यात येणाऱ्या उमेदवारास पेसा क्षेत्रातील सजेवरच नियुक्ती देण्यात येईल.

- **टिप** :-

१) जाहिरातीमध्ये नमुद पदांच्या संख्येमध्ये अतिरिक्त संवर्ग कक्ष, आंतरविभागीय समायोजन, विभागीय बदली व इतर विभागातील पदांचा आढावा इत्यादी आणि अन्य कारणांमुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी / जास्त होणे) व जातनिहाय आरक्षण किंवा समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२) जाहिरातीमध्ये नमुद पदांच्या संख्येमध्ये समांतर आरक्षणासंदर्भात दर्शविण्यात आलेली पदसंख्या वेगळी नाही. सदर आरक्षण त्या-त्या जात प्रवर्गातील (सामाजिक आरक्षणातील) एकुण पदांपैकीच आहे. समांतर आरक्षणापैकी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवाराद्वारे सदरचे पद भरले जाईल.

३) जाहिरातीमध्ये नमुद पदांच्या संख्येमध्ये कमी / जास्त बदल होण्याचा संभव आहे. म्हणून याबद्दल उमेदवारांची कोणतीही तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही. याबाबतचे **अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, जळगाव यांनी राखून ठेवलेले आहेत.**

४) शासनाने भरती बाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इ. लागू राहतील.

- **महत्वाच्या अटी व शर्ती** :-

१) जाहिरातीमध्ये नमुद समांतर आरक्षणानुसार महिला, माजी सैनिक, पदवीधर अंशकालीन उमेदवार, खेळाडू, प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त प्रवर्गातील उमदेवारांना नियमानुसार देय असलेल्या सवलती देणेत येतील.

२) जाहिरातीमध्ये नमुद पदे पदोन्नतीने, सेवानिवृत्तीने, स्वेच्छा सेवानिवृत्तीने, राजीनामा, आंतरविभाग / जिल्हा बदली तसेच कार्यरत कर्मचारी मयत झालेने रिक्त झालेली आहेत. तसेच सदर जाहिरातीसाठी रिक्त पदांची गणना करताना दि. ३१/१२/२०१७ अखेरच्या संभाव्य रिक्त पदांचा त्यात समावेश करण्यात आलेला आहे.

३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ, दि. २७/०६/२००८ मधील तरतुदीनुसार, सदरची पदे भरणेसाठीची **अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची ही, सदर याद्या प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष मुदतीसाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल, तद्नंतर ही निवडसूची व प्रतिक्षासूची व्यपगत होईल**.

४) समांतर आरक्षणांतर्गत त्या-त्या प्रवर्गासाठी विहित केलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळणेसाठी त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांतून जागा भरणेत येतील.

५) सदर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, परीक्षेच्या कार्यक्रमामध्ये अशंतः बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, तथा जिल्हाधिकारी जळगाव स्वतः कडे राखून ठेवीत आहेत. भरती प्रक्रिये संदर्भात उद्‌भवणारे कोणतेही वाद, तक्रारी इत्यादीबाबत जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

६) **माजी सैनिकांबाबत Government of India, Ministry of Personnel P.G & Pensions (Department of Personnel & Training) No. 36034/5/85-Estt(SCT), New Delhi Dt. 27 October,** १९८६ च्या राजपत्रानुसार सैनिक दलात कार्यरत असताना ०१ वर्षा अगोदर माजी सैनिक या समांतर आरक्षणांतर्गत राखीव असलेल्या पदासाठी अर्ज करता येईल. **तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास नियुक्तीचे अधिकार हे जिल्हा निवड समिती, जळगाव यांना राहतील.**

७) **अपंग उमेदवारांबाबत** :- शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. अपंग-२००६ /प्र.क्र.१०५/सुधार-३ दि. ०१/१२/२००६ मधील परिच्छेद क्र. २ नुसार पुर्णपणे अंध असलेल्या अथवा

अल्पदृष्टीचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवाराने लेखनिकाचे सहाय्य घेण्याची परीक्षेपूर्वी मागणी केल्यास त्यांना लेखनिकाचे सहाय्य घेण्यास परवानगी देण्यात येईल. तथापि ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतेवेळी तशी मागणी नोंदविणे आवश्यक राहील. **सदर मागणीनुसार जिल्हा निवड समितीमार्फत लेखनिक पुरविण्याची व्यवस्था करण्यात येईल.** तसेच, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडील परिपत्रक क्र. अकआ/प्र-७/लेखनिक-सुविधा/२००६-०७/२९५१, दि. २०/१२/२००६ अन्वये शैक्षणिक परीक्षा / नेमणुकीसाठी घ्यावयाची परिक्षा यासाठी अपंग उमेदवारांना लेखनिकाची सवलत देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे देणेत आलेली आहे. **त्यानुसार लेखनिकाचे सहाय्य घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरताना लेखनिकाची मागणी नोंदविणे आवश्यक राहील. तथापि, तशी मागणी न केल्यास लेखनिकाचे सहाय्य मिळणार नाही.** त्याचप्रमाणे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक क्र. न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२, दि. १८/०३/२०१४ मधील सुचनेनुसार दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेलेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेले **विद्यार्थी / उमेदवार लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास परिक्षा प्रयोजनार्थ त्यांचे मागणीप्रमाणे लेखनिक जिल्हा निवड समिती, जळगाव यांचेमार्फत पुरविण्यात येईल.**

- **शैक्षणिक अर्हता** :-
- जाहिरातीमध्ये नमुद पदांसाठी अर्ज करणेकामी **जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी (दि.** ०१/०८/२०१६ )

उमेदवाराने पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता पुर्णतः धारण करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **आवश्यक शैक्षणिक अर्हता** |
|---|---|---|
| १ | लिपीक-टंकलेखक | १) किमान अर्हता **माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण** असणे आवश्यक.<br>२) **कमीत कमी मराठी ३० शब्द प्रती मिनीट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रती मिनीट वेगाची टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.** सदर वेगाबाबतची शासनामार्फत घेण्यात येणारी परीक्षा जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास (**दि.** ०१/०८/२०१६) किंवा तत्पुर्वी उत्तीर्ण असणे व त्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.<br>३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे.<br>४) महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दि. ०४/०२/२०१३ मध्ये नमुद केलेनुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.-६१/ २००१/३९ दि.१९/०३/२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.<br>५) माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, |

| | | |
|---|---|---|
| | | निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>६) शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. निवक- १०१० /प्र.क्र. ०८/२०१०/१६-अ, दि. ०६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवाराना जर त्यांना लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येईल. सदर मुदतीच्या आत संबंधित उमेदवारास विहित केलेली टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. |
| २ | वाहनचालक | १) Motor Vehicles Act, १९३९ नुसार Heavy Vehicle or a motor car or a jeep चालविणेबाबतचा वैध वाहन परवाना धारण करणे आवश्यक.<br>२) कोणत्याही मान्यता प्राप्त शाळेतून इयत्ता ४ थी ची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) मराठी आणि हिंदी भाषा बोलता येणे आवश्यक आहे.<br>४) मोटार वाहन चालविणेबाबतचे कमीत कमी ३ वर्षाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>५) सदर उमेदवाराची वर्तणूक चांगली असणे आवश्यक.<br>६) मोटार वाहन दुरुस्तीबाबतचे ज्ञान असणे आवश्यक.<br>७) चारचाकी वाहन चालविणेकामी शारिरिक दृष्ट्या सुदृढ असणे आवश्यक.<br>८) जळगाव जिल्ह्याच्या भौगोलिक क्षेत्राचे ज्ञान असणे आवश्यक. |
| ३ | तलाठी<br>(पेसा क्षेत्राबाहेरील) | १) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मुंबई यांचेकडील दि. ०१ जुलै २०१० च्या अधिसूचनेनुसार, **पदवी** धारण करणे आवश्यक आहे.<br>• **पदवी म्हणजे** संविधानिक विद्यापीठाची पदवी, तसेच शासनाने त्याच्याशी सममुल्य म्हणून जाहीर केलेली अन्य अर्हता उत्तीर्ण असणे / धारण करणे आवश्यक.<br>२) **मराठी भाषेचे ज्ञान** आवश्यक आहे.<br>३) महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस २०१२/प्र.क्र. २७७/३९, दि. ०४/०२/२०१३ मध्ये नमुद केलेनुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.-६१/ २००१/३९ दि.१९/०३/२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.<br>४) माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. |
| ४ | तलाठी<br>(पेसा क्षेत्रातील) | |

| | | |
|---|---|---|
| ५ | कनिष्ठ लिपीक | अ.क्र. १ वरील लिपीक-टंकलेखक पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेप्रमाणे. |

- **खेळाडू उमेदवारांसाठी आवश्यक अर्हता** :- जाहिरातीमध्ये नमुद पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या खेळाडू उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे अर्हता धारण करणे / असणे आवश्यक आहे.

१) खेळाडू हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याला मराठी भाषेचे ज्ञान असावे.

२) खेळाडूने सदर पदांसाठी सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

३) सदर पदांसाठी त्या-त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिंपीक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य राहील. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडुंचा यासाठी विचार करण्यात येणार नाही. राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये (ग्रुक्क) अंडर ऑफिसर्सची रँक मिळवून राष्ट्रीय छात्र सेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

४) खेळाडुंचे कामगिरीविषयक प्रमाणपत्र संबंधित खेळांचे राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव, संबंधित खेळाचे राज्य संघटनेचे सचिव या प्राधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र विहित नमुन्यांत असणे आवयश्यक आहे. या पदांवर ज्या खेळाडुंची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडुन शासन निर्णय दि. ३०/०४/२००५ मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे आहेत किंवा नाहीत हे तपासून घेण्यात येईल.

५) भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त खेळाडु भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त खेळाडु उमेदवार खेळाडू प्रवर्गासाठी राखीव पदांसाठी अर्ज करू शकतील.

६) खेळाडुंना आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/प्र.क्र६८/क्रीयुसे-२, दि. ३०/०४/२००५, शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. २१/०६/२००६, शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८ /क्रीयुसे-२, दि. १८/११/२००६, शासन निर्णय क्र. क्रिस्पर्धा-२१०८/(प्र.क्र.४४०/०८)/क्रीयुसे-२, दि. २०/०९/२०१३, शासन निर्णय

क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. ३०/१२/२०१३ आणि वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

- **वयोमर्यादा :- जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशीचे दि. ०१/०८/२०१६ रोजीचे वय गणण्यात येईल.**

१) **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी** :- **जाहिरात प्रसिध्दीच्या दिवशी (दि. ०१/०८/२०१६** रोजी) उमेदवाराचे वय, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र. ४०४/कार्या.१२, दि. २५ एप्रिल, २०१६ मधील तरतुदीनुसार किमान १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) **मागासवर्गीय उमदेवारांच्या बाबतीत** :- **दि. ०१/०८/२०१६** रोजी उमेदवाराचे वय किमान १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे. तथापि, उन्नत व प्रगत गटांमध्ये क्रिमीलेयर (Creamy Layer) मोडणाऱ्या वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क, भ.ज.ड., वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गातील उमेदवारांना ही सवलत लागू राहणार नाही.

३) **पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी** :- शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र. २००/२००९/१६-अ, दि. २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार, कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

४) **स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगनणा कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांचेसाठी** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. निवक-१०१०/प्र.क्र. ०८/२०१०/१६-अ, दि. ०६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. या घटकांतील मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखील उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकीच राहील.

५) **खेळाडू उमेदवारांसाठी** :- शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि. ३०/०४/२००५ मधील तरतुदीनुसार, खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या विहित वयोमर्यादेत ०५ वर्षांतर्यत वयाची अट शिथिल करण्यात येईल.

६) **अपंग उमेदवारांसाठी** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९८ /प्र.क्र.३९/९८/१६-अ, दि. १६/०६/२००१ मधील तरतुदीनुसार, उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्ष इतकी राहील. तथापि, अपंग प्रवर्गातील उमेदवाराचे किमान अपंगत्वाचे प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच, त्यांची निवड झाल्यानंतर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची अंतिम नियुक्ती केली जाईल. सदर प्रमाणपत्रावर उमेदवाराचा फोटो असणे आवश्यक आहे.

७) **प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रकल्प-१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/०६/१६-अ, दि. ०३/०२/२००७ मधील तरतुदीनुसार, कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनाही कमाल वयोमर्यादेबाबत ४५ वर्षापर्यंतचीच सवलत राहील.

८) **माजी सैनिकांच्या बाबतीत** :- शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २०/०८/२०१० मधील तरतुदीनुसार, माजी सैनिकांच्या **"सध्याच्या वयामधून, त्यांचा सशस्त्र दलातील सेवाकालावधी** अ ०३ **वर्षे वय कमी करुन जे वय येईल" ते वय ग्राहय धरण्यात येईल. तथापी अशा प्रकारे गणना (Calculation) करून येणारे वय जाहिरातीमध्ये नमुद पदांच्या सेवाप्रवेशासाठी जी सर्वांकरीता लागू केलेली वयाची अट आहे, त्यापेक्षा जास्त नसावे.**

९) **अपंग माजी सैनिकांसाठी** :- कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे पर्यंत राहील.

## • परीक्षेचे स्वरूप व त्याअनुषंगिक सुचना :-

| अ. क्र. | पदाचे नाव | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | अंकगणित | | बौध्दिक चाचणी | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण |
| १ | लिपीक-टंकलेखक | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ०० | ०० | **१००** | **२००** |
| २ | वाहनचालक | **खालील मुद्दा क्र. १ मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.** | | | | | | | | | | | |
| ३ | तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ०० | ०० | २५ | ५० | **१००** | **२००** |
| ४ | तलाठी (पेसा क्षेत्रातील) | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ०० | ०० | २५ | ५० | **१००** | **२००** |
| ५ | कनिष्ठ लिपीक | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | २५ | ५० | ०० | ०० | **१००** | **२००** |

१) **वाहनचालक पदासाठी फक्त** १०० **गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. तथापि, वाहनचालक पदासाठी मोठ्या संख्येने अर्ज प्राप्त झाल्यास आणि तेवढ्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेणे शक्य नसल्यास, त्यावेळी उमेदवारांची संख्या मर्यादित होण्याकरिता व अधिक सक्षम उमेदवार उपलब्ध होण्याकरिता जिल्हा निवड समितीमार्फत चाळणी परीक्षा घेण्यात येईल. अशा चाळणी परीक्षेतील प्रश्नांचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे राहील. चाळणी परिक्षेमधील प्रश्नांचा स्तर / दर्जा संबंधित पदाकरिता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच, संबंधित पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पुरक राहील. अशी चाळणी परीक्षा घ्यावयाची ठरल्यास, सदर चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, प्रश्नांचा प्रकार व प्रश्नसंख्या इत्यादि बाबी निश्चित करुन जिल्हा निवड समितीमार्फत पुर्वप्रसिध्दी देण्यात येईल. या चाळणी परीक्षेतून 'प्रवर्गनिहाय रिक्त पदांच्या संख्येच्या चौपट' या प्रमाणात पात्र ठरणाऱ्या उच्चस्तर गुणवत्ताधारक उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात**

**येईल. तथापि, सदर चाळणी परीक्षा ही फक्त उमेदवारांची संख्या मर्यादित / कमी करण्यासाठी असून सदर परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांचा विचार अंतिम निवडसूची तयार करताना करण्यात येणार नाही. वर नमुद केलेनुसार चाळणी परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय, जिल्हा निवड समिती, जळगाव स्वतःकडे राखून ठेवीत आहे. याबाबत जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणत्याही उमेदवाराची कोणत्याही स्वरुपातील तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

२) लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका **वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक** २ **गुण ठेवण्यात येतील.**

३) **लिपीक-टंकलेखक आणि कनिष्ठ लिपीक पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांसाठी** :- शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ, दि. १९/१०/२००७ मधील तरतुदीनुसार, कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे अशा पदांकरिता **परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल** व **लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल**.

४) **तलाठी पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांसाठी** :- शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ, दि. १९/१०/२००७ मधील तरतुदीनुसार ज्या पदांकरिता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरीता **परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील**. **परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) च्या दर्जाच्या समान राहील** व **लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नाकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेणेत येईल**.

५) शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं २००९/प्र.क्र. ३५६/ई-१०, दि. ०१/०१/२०१० मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-१२१४/प्र.क्र. (४३/१४)/१३-अ, दि. ०५/०६/२०१४ मधील तरतुदीनुसार, **या पदांकरिता मौखिक परीक्षा (मुलाखती) घेण्यात येणार नाहीत. वाहनचालक पदासाठी वरील अ.क्र. १ मध्ये नमुद केलेली सुचना लागु राहील. इतर पदांसाठी फक्त लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे निवडसूची (मेरीट यादी / गुणवत्ता यादी) तयार केली जाईल. सदर निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस केली जाईल.**

६) उमेदवारांची निवडसूची तयार करणेसाठी शासन, **सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ दि.** १६/०३/१९९९ **आणि शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही** १०१२/**प्र.क्र.**१६/१२/१६-**अ, दि.** १३/०८/२०१४ **अन्वये कार्यवाही करण्यात येईल.**

७) शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ, दि. २७/०६/२००८ मधील तरतुदीनुसार **गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकुण गुणांच्या किमान** ४५% **गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.**

८) परीक्षेचा निकाल (निवडसूची) तयार करताना **परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-**१२१५/**प्र.क्र.** ५५/१५)/१३-**अ, दि.** ०५/१०/२०१५ **मध्ये नमुद निकषांच्या आधारे क्रमवार लावला जाईल.**

९) निवड झालेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडील शारीरिक क्षमतेबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१०) शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-२०१०/२०९/प्र.क्र.६६/१०/१३-अ, दि. १९/०६/२०१० मधील तरतुदीनुसार लेखी परीक्षा घेतेवेळी **उत्तरपत्रिकेवर उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचा वापर करावा लागेल.**

११) लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त कलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडसूची व प्रतिक्षा सुची तयार करण्यासाठी उमेदवारांना त्यांचे **शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी संबंधितांचा विचार केला जाणार नाही.**

१२) लेखी परीक्षा दिलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेले गुण www.jalgaon.nic.in / www.jalgaon.gov.in या संकेतस्थळावर पाहता येतील. या गुणवत्ता यादीतून सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

- **परीक्षा शुल्काची आकारणी व शुल्क भरणा प्रक्रिया** :-

सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **आवश्यक परीक्षा शुल्क** | |
|---|---|---|---|
| | | **खुला प्रवर्ग** | **राखीव प्रवर्ग (मागास प्रवर्ग)** |
| १ | लिपीक-टंकलेखक | र.रु. ३००/- | र.रु. १५०/- |
| २ | वाहनचालक | र.रु. ३००/- | र.रु. १५०/- |
| ३ | तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) | र.रु. ३००/- | र.रु. १५०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | तलाठी (पेसा क्षेत्रातील) | लागु नाही | र.रु. १५०/- |
| ५ | कनिष्ठ लिपीक | र.रु. ३००/- | र.रु. १५०/- |

**परिक्षा शुल्कासंबंधी सुचना** :-

१) माजी सैनिकांना परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही.

२) वरील शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे. याशिवाय भारतीय स्टेट बँकेकडून (State Bank Of India) **र.रु. ४०/- इतके प्रक्रिया शुल्क** आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवारानेच भरावयाचे आहे.

३) उक्त परीक्षा शुल्क हे भारतीय स्टेट बँकेच्या (State Bank Of India) कोणत्याही शाखेत ऑनलाईन अर्ज भरताना प्राप्त झालेल्या विहित चलनाद्वारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

**४)** या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ www.jalgaon.nic.in / www.jalgaon.gov.in वर ऑनलाईन अर्ज परिपुर्ण भरल्यानंतर भारतीय स्टेट बँकेत (State Bank Of India) शुल्क भरण्याबाबतचे चलन तीन प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समिती, जळगाव ची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमुद असलेले आवश्यक ते शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या (State Bank Of India) कोणत्याही शाखेमध्ये पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावे. सदर तीन प्रतींपैकी उमेदवारास त्याची व जिल्हा निवड समिती, जळगाव ची प्रत भारतीय स्टेट बँकेकडून (State Bank Of India) परत मिळेल. त्यापैकी जिल्हा निवड समिती, जळगाव ची प्रत उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे. **सदर चलनाची मुळ प्रत असल्याशिवाय उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार नाही.**

५) भारतीय स्टेट बँकेच्या (State Bank Of India) कोणत्याही शाखेमध्ये परीक्षा शुल्क भरणेचा कालावधी **दि. ०६/०८/२०१६ ते दि. २२/०८/२०१६** राहील. त्यानंतर बँकेत परीक्षा शुल्क भरणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

६) उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेच्या (च्द्यठ्ठद्यड्ढ एठ्ठदत्त ग्ढ क्ष्दड्डत्ठ) कोणत्याही शाखेमध्ये परीक्षा शुल्क भरल्यानंतर त्याची स्थिती या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ www.jalgaon.nic.in / www.jalgaon.gov.in वर पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पाहता येऊ शकेल.

- ## ऑनलाईन अर्ज करावयाची कार्यपध्दती व इतर सुचना :-

१) उमेदवारांनी संपूर्ण जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

२) ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची शैक्षणिक अर्हता / पात्रता, त्यासाठी आवश्यक वयोमर्यादा, अनुभव व इतर अनुषंगिक माहिती जाहिरातीमध्ये काळजीपुर्वक वाचावी. सदर

पदाची शैक्षणिक अर्हता / पात्रता, त्यासाठी आवश्यक वयोमर्यादा, अनुभव व इतर अनुषंगिक अर्हता धारण करीत असल्याची खात्री झाल्यावरच अर्ज भरावा.

३) सदर परीक्षांसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. **कोणत्याही उमेदवाराने इतर कोणत्याही प्रकारे या कार्यालयास अर्ज सादर केल्यास सदर अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच, यापुर्वी अर्ज सादर केला असल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही व त्या अर्जास या कार्यालयामार्फत कोणत्याही प्रकारचे उत्तर देखील दिले जाणार नाही. यासंदर्भात कोणत्याही उमेदवाराच्या तक्रारीची या कार्यालयामार्फत दखल घेतली जाणार नाही.**

४) सर्व पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज या कार्यालयाच्या www.jalgaon.nic.in / www.jalgaon.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर **दि. ०४/०८/२०१६ ते दि. २०/०८/२०१६** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांक व वेळेनंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

५) **उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने, अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे वा अन्य कोणतेही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता नाही. तथापी, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक, संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासुनच अर्ज सादर करावा.**

६) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वतःचा अलीकडील काळातील दोन्ही कान दिसतील असा पासपोर्ट फोटो स्वतः जवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवेळी फोटो व सही स्कॅन करून संकेतस्थळावरील सूचने नुसार अपलोड करणेआवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज अचूक भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील व त्या अनुषंगाने कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही.

७) फोटो व सही स्कॅन करुन त्याची च्ह्ढ किती आवश्यक आहे ? याबाबत ऑनलाईन अर्ज भरताना खात्री करुन घ्यावी.

८) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नाव नोंदणी केली असली तरीदेखील वरील पदासाठी रितसर ऑनलाईन अर्ज अधिकृत संकेतस्थळावर करणे व परीक्षा शुल्क बँकेत भरणे आवश्यक आहे.

९) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराजवळ स्वतःचा वापरात असलेला ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.

१०) उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावा, जेणेकरून आपणास संपर्क करून आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जाद्वारे नोंदविलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) व ई-मेल आयडी हा अपुर्ण अथवा चुकीचा असल्यास, तसेच मोबाईल क्रमांक NCPR Registered (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, याद्वारे संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, जळगाव हे जबाबदार असणार नाहीत. **या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळाला भरती प्रक्रियेदरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.**

११) ऑनलाईन पध्दतीने अर्ज परिपुर्ण भरल्यानंतर भारतीय स्टेट बँकेत (State Bank Of India) शुल्क भरण्याबाबतचे चलन तीन प्रतींमध्ये (उमेदवाराची प्रत, बँकेची प्रत व जिल्हा निवड समिती, जळगाव ची प्रत) उपलब्ध होईल. सदर चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फतच उमेदवाराने चलनात नमुद असलेले आवश्यक ते शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या (State Bank Of India) कोणत्याही शाखेमध्ये पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरावे. बँकेत शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने शुल्क नोंदीच्या स्थितीसह अर्ज अपडेट झाल्यावर **अर्जाची प्रिंट स्वतः काढावी व ती आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी.** अर्जदाराने नियमितपणे संकेतस्थळाला भेट द्यावी. **ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत काढून जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे पाठविण्याची आवश्यकता नाही. सदर अर्जाची प्रिंट मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी उपस्थित करणे आवश्यक राहील.**

१२) पदासाठी आवश्यक असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

१३) ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत अदा केले आहे व संपूर्ण माहिती भरून प्रिंट काढली आहे, त्यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) त्यांच्या लॉग ईन आयडीद्वारे अधिकृत संकेतस्थळावरून प्राप्त करुन घेता येईल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४) **परिक्षा केंद्रावर प्रवेशपत्र आणि ओळखपत्रासह परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे.** उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार

नाही. तसेच उमेदवारांनी स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅन कार्ड, निवडणुक ओळखपत्र, आधार कार्ड, इ. व त्यांची स्वयंसाक्षांकीत छायाप्रत (Xerox) सोबत आणणे बंधनकारक राहील. **फोटो असलेले ओळखपत्र व त्याची स्वयंसाक्षांकीत छायाप्रत** (Xerox) **सोबत न आणल्यास उमेदवारास कोणत्याही परिस्थितीत परिक्षेला बसू दिले जाणार नाही.**

१५) **पदभरतीच्या कार्यक्रमात नमुद केल्यानुसार उमेदवारांनी या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे. प्रवेशपत्रावर उमेदवाराने त्याचे पासपोर्ट आकाराचे रंगित छायाचित्र चिकटवून त्यावर राजपत्रित अधिकाऱ्याचे साक्षांकन करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाने अगर ई-मेलद्वारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच प्रवेशपत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही**.

१६) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यात काही अडचणी आल्यास त्यांनी ७७७६९००५४८, ७७७६९००५४९ या क्रमांकावर **दि.** ०४/०८/२०१६ **ते दि.** २०/०८/२०१६ या ऑनलाईन अर्ज भरण्याच्या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेतच संपर्क साधावा.

१७) **अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास संबंधित उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकणेस पात्र राहील व भा.दं.वि. संहिताचे कलम** १९९, ४२० **व** २०० (२) **प्रमाणे कारवाईस पात्र राहील.**

१८) लहान कुटूंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमुना कार्यालयीन संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर प्रतिज्ञापत्र मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.

- ## समांतर आरक्षणांतर्गत असलेल्या कोट्यातील पदांसाठी अटी व शर्ती :-

१) **महिला आरक्षण** :- शासन, महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२००० /प्र.क्र.४१५/का.२ दि. २५/०५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी **सन** २०१६-२०१७ या कालावधीकरीता वैध असलेले (**दि.** ३१/०३/२०१७ **पर्यंत वैध असलेले**) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२) **माजी सैनिक आरक्षण** :- गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास मुळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे

आवश्यक आहे. निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत. माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युध्द काळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजी सैनिकांना १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यात येईल. तसेच युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला त्यानंतरच्या पसंती क्रमाने १५% आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदांवर नियुक्ती देण्यात येईल.

३) **अंशकालीन उमेदवार आरक्षण** :- अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय क्र. इएमपी-१४७८/३४९३/आयएनडी.१३, दि.३०/११/१९७८ मधील तरतुदीनुसार सुशिक्षित बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असणे आवश्यक आहे. तसेच, **सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असणे आवश्यक आहे.** अशा मानधनावर काम केलेल्या केलेल्या अंशकालीन पदवीधर / पदविकाधारक उमेदवारांनी सदरच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयात नोंदणी असणे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. **निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.**

४) **अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू आरक्षण** :- खेळाडू उमेदवारांसाठी असलेले आरक्षण शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०२/प्र.क्र. ६८/क्रियुसे-२, दि. ३०/०४/२००५ मधील तरतुदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे सदर शासन निर्णयासोबतच परिशिष्ट अ मध्ये नमुद खेळामध्ये राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावर प्राविण्य मिळविल्याचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे असावे. **लेखी परीक्षेत निवड झालेल्या खेळाडू उमेदवारांचे खेळाबाबतचे प्रमाणपत्र हे क्रीडा संचालनालय, पुणे यांचे कार्यालयाकडुन पडताळणी करुन वैध असलेचे मुळ प्रमाणपत्र असल्याशिवाय खेळाडू प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश दिला जाणार नाही.**

५) **प्रकल्पग्रस्त उमेदवार आरक्षण** :- गुणवत्तायादी मध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. **लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडुन**

**पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.**

६) **भुकंपग्रस्त उमेदवार आरक्षण** :- गुणवत्तायादी मध्ये येणाऱ्या भुकंपग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील भुकंपग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. **लेखी परीक्षेत निवड झालेल्या भुकंपग्रस्त उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडुन पडताळणी करुन घेतले जाईल. सदर पडताळणीअंती प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.**

७) **अपंग आरक्षण** :- अपंग प्रवर्गातील उमेदवारांचे किमान अपंगत्वाचे प्रमाण ४०% असल्याबाबतचे स्थायी वैद्यकिय मंडळाचे मुळ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

## • पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, आवश्यक कागदपत्र तसेच इतर महत्वाच्या अटी व शर्ती :-

१) **उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याकडेस महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

२) तलाठी पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि. २७ जून २०११ नुसार ज्या परिक्षार्थींकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांतदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

३) **उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.**

४) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) निवडअंती सादर करणे आवश्यक आहे.

५) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि. १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, **तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.**

६) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम, २००१ ( सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि. २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. यांना लागू आहे. सदर प्रवर्गातील उमेदवारांकडे **दि. ३१ मार्च, २०१७** पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअरचे सक्षम अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. नॉन क्रिमिलेअरचे तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागू राहील.

७) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८) लेखी परीक्षा जळगाव जिल्ह्यातील कोणत्याही परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल.

९) एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

१०) समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ दि. १६/०३/१९९९ आणि शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि. १३/०८/२०१४ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

११) नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दि. २१/१०/२००५ नुसार लागु करण्यात आलेली नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना (New Defined Contributory Pension Scheme) लागु राहील. त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण), नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाहनिधी योजना लागू राहणार नाही.

१२) अंतिम निवडसूची व प्रतिक्षासूची मध्ये समावेश झालेल्या उमेदवारांनी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे :-

त) पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

त्त) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.२८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि. ०१/०७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ अन्वये दि. २८/०३/२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्ये बाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

त्त्त) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलबध्द असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा.उमेदवार/ अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Crimilayer) इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्रधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास आपली निवड रदद समजणेत येईल.

१३) अंतिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

१४) उमेदवाराने लेखी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवडसूची तयार केली जाईल. अंतरिम निवडयादी मधून पदांच्या आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवडसूची तयार केली जाईल.

१५) विहित शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा धारण करणाऱ्या इच्छुक शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत मुळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१६) नियुक्ती झाल्यानंतर लिपीक-टंकलेखक उमेदवारांना जिल्हयातील कोणत्याही कार्यालयात आणि तलाठी उमेदवारांना जिल्हयातील कोणत्याही उपविभागामध्ये नियुक्ती देण्यात येईल. संबंधित उमेदवार यांनी

त्यांचे नियुक्तीच्या पदावर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ३० दिवसांचे आत रुजु होणे आवश्यक राहील.

- **पदभरतीचा कार्यक्रम / वेळापत्रक :-**

तलाठी पदभरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील. त्यामध्ये जिल्हा निवड समितीमार्फत काही बदल करावयाचा झाल्यास या कार्यालयाच्या www.jalgaon.nic.in / www.jalgaon.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

| अ. क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | संभावित दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा कालावधी. | दि. ०४/०८/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. २०/०८/२०१६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपावेतो. |
| २ | भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित चलनाद्वारे परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | दि. ०६/०८/२०१६ ते दि. २२/०८/२०१६. (भारतीय स्टेट बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) |
| ३ | लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | त्या-त्या पदाच्या लेखी परीक्षेच्या दिनांकापूर्वी ०५ दिवसांपासून लेखी परीक्षेच्या दिनांकापावेतो. |

| अ.क्र. | पदाचे नाव | लेखी परीक्षेचा दिनांक व वेळ | |
|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ |
| १ | लिपीक-टंकलेखक | दि. ०४/०९/२०१६ | स. ११.०० ते दु. ०१.०० |
| २ | वाहनचालक | सदर दिनांक नंतर जाहिर करण्यात येईल. | |
| ३ | तलाठी (पेसा क्षेत्राबाहेरील) | दि. ११/०९/२०१६ | स. ११.०० ते दु. ०१.०० |
| ४ | तलाठी (पेसा क्षेत्रातील) | दि. ११/०९/२०१६ | स. ११.०० ते दु. ०१.०० |
| ५ | कनिष्ठ लिपीक | दि. ०४/०९/२०१६ | स. ११.०० ते दु. ०१.०० |

**दिनांक** :- ०१/०८/२०१६.
**ठिकाण** :- जळगाव.

**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**निवासी उपजिल्हाधिकारी, जळगाव**

**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी, जळगाव**